# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF/AZ/U/167/2009/01/ Date :-

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub :- Forwarding of grievance in respect of Chairman, Aurangabad District Gramsevak Co-Operative Credit Society,Ltd., H.No.1-16-809, Naralibaugh, Aurangabad. (Con. No.490010367261 )

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Chairman, Aurangabad District Gramsevak Co-Operative Credit Society,Ltd., H.No.1-16-809, Naralibaugh, Aurangabad.

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excess/average bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **06.01.2009 at 13.30 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**
Chairman,
Aurangabad District Gramsevak
**Co-Operative Credit Society,Ltd.,**
**H.No.1-16-809, Naralibaugh,**
**Aurangabad.**

**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM**
**AURANGABAD ZONE, AURANGABAD**

( **Case No. CGRF/AZ/AUR/U/167/2009/01** ).

**The Chairman**

**Aurangabad District Gramsevak**

**Credit Coop. Society,Aurangabad** **Consumer Complainant.**

**( Con.No. 490010367261)**

**V/s**

**M.S.E.D.C.L. Urban Circle, Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 06.01.2009**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006

**INTERIM ORDER**

The consumer has filed an application in the Forum against the wrong bill issued by the Distribution Licensee for the period of 31.12.07 to 10.02.08 and contended that the meter reader has recorded wrong reading and the bill issued him on this basis is abnormal . The consumer also contended that he has filed application for rectification of bill but no cognizance of his application was taken by the D.L. and his supply was disconnected on account of non payment of bill without giving any prior intimation. He therefore requested to direct the D.L. to reconnect his supply and to revise the bill as per meter reading.

On the date of hearing , the consumer representative Shri V.D.Nawal was present. Nodal officer was absent but filed an application for grant of extension for filing his say.

On going through the documents filed by the consumer we observed that the Photo of the meter on the bill shows figure as 1517 whereas the D.L. has issued him showing the reading as 1829 . The bill amount is for 375 unist which high as compared to his average consumption.

The Forum observed that the said bill issued to the consumer is wrong and the action of disconnection without giving prior notice is violation of provision of section 56 of E.I. Act 2003. The Forum hereby direct the Distribution Licensee not to disconnect the electricity supply of the consumer.

This Interim order shall be subject to final decision on the grievance of the consumer, that may be passed by the Forum. The next date of hearing is kept **on 14.1.09 at 12.00 hrs.**

| | | |
|---|---|---|
| **( P.A.Sagne )** | **(H.A.Kapadia)** | **( V.A.Hambire)** |
| **Member/Secretary** | **Member** | **President** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६७/२००९/०१**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०२/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- ०४/०२/२००९**

**चेअरमन,**
**ग्रामसेवक सहकारी पतसंस्था मर्यादित,**
**एच एन १-१६-८०,**
**नारळीबाग औरंगाबाद,**
**(ग्राहक क्र.४९००१०३६७२६१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०२/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०६/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

१) अर्जदार हे औरंगाबाद जिल्हा ग्रामसेवक सहकारी संस्थाचे चेअरमन असुन त्यांनी मंचात दाखल केलेल्या तक्रारीचा सांराश खालील प्रमाणे आहे. महावितरण कंपनीतर्फे त्यांना नोव्हेबर २००७ या महिन्याचे ४६०/-चे वीज बिल आकारण्यात आले ज्याचा भरणा त्यांनी केलेला आहे. डिसेंबर २००७ मध्ये त्यांच्या मीटरवरील रिडींगपेक्षा जास्तीची रिडींग दर्शवित त्यांना वीज बिल देण्यात आले. याबाबतीत त्यांनी महावितरण वीज कंपनीच्या संबंधीत विभागाकडे केलेल्या तक्रारीची दखल न घेता त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला अर्जदाराने त्याचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्याबाबत तसेच सुधारीत वीज बिल देण्याबाबत महावितरण कंपनीस आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ०६/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री नवाल उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी उपस्थित नव्हते.अर्जदाराने महावितरण कंपनीतर्फे त्यांना ३१/१२/२००७ ते १०/०२/२००८ या काळात देण्यात आलेल्या वीज बिलातील मीटरच्या फोटोमध्ये रिडींग १५१७ अशी दिसुन येत असल्यामुळे त्यांच्या बिलात नमुद केलेली १८२९ ही रिडींग चुकीची असल्याचे मंचास आढळुन आले. मंचाने अर्जदाराचा या चुकीच्या वीज बिलापोटी खंडीत केलेला वीज पुरवठा २४ तासात चालु करण्याचा अंतरिम आदेश पारीत केला व पुढील सुनावणी दिनांक १४/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक १४/०१/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपला जवाब मंचात दाखल केला त्यांनी आपल्या जवाबात अर्जदारास चुकीचे रिडींग घेतली गेल्यामुळे वाढीव वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे मान्य केले व बिल रिव्हीजन करून देण्याची तयारी दर्शविली मंचाने नोडल अधिकारी यांना बिल रिव्हीजन प्रस्ताव १७/०१/२००९ पर्यत दाखल करण्याचा आदेश देत प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) अर्जदार व नोडल अधिकारी यांच्यातर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, महावितरण कंपनीतर्फे डिसेंबर २००७ मध्ये अर्जदारास मागील रिडींग व चालु रिडींग अनुक्रमे १४१५ व १४५४ अशी दाखवत ३९ युनिट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. तसेच जानेवारी २००८ मध्ये अर्जदारास मागील रिडींग १४५४ व चालु रिडींग १८२९ अशी दाखवत ३७५ युनीट वीज वापराचे बिल आकरण्यात आल्याचे दिसुन येते. दिनांक २६/११/२००८ रोजी कनिष्ठ अभियंता, जुने पावर हाऊस यांनी केलेल्या स्थळ पाहणी अहवालात मीटरवरील रिडिंग १६८१ अशी असल्याची नोंद केलेली आहे. यावरून जानेवारी २००८ मध्ये दाखवण्यात आलेली १८२९ रिडींग तसेच त्यापुढील काळासाठी दाखवण्यात आलेली रिडींग ही चुकीची असल्याचे स्पष्ट होते. नोडल अधिकारी यांनी देखील आपल्या जवाबात मीटर रिडरने रिडींग चुकीची घेतली असल्यामुळे अर्जदारास वाढीव व चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे म्हटले आहे. दिनांक १४/०१/२००९ रोजी अर्जदाराच्या मीटर वरील रिडींग १६९५ अशी असल्यामुळे अर्जदाराचा जानेवारी २००८ ते १४/०१/२००९ या काळातील एकुण वीज वापर (१६९५-१४५४) -२४१ युनीट असा असल्याचे स्पष्ट होते.

चुकीची मीटर रिडींग नोंद घेणे,ग्राहकाच्या तक्रारीची दखल न घेता व कोणतीही पुर्वसुचना न देता वीज पुरवठा खंडीत करणे ही सेवेतील त्रुटी मानन्यात येत असुन अर्जदाराने केलेली तक्रार योग्य असुन तो नुकसान भरपाई मिळण्यात पात्र आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास जानेवारी २००८ नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने जानेवारी २००८ ते १४ जानेवारी २००९ या काळात अर्जदारास एकुण २४१ युनीट वापराचे बिल विभागुन तीस दिवसात अर्जदारास सुधारीत वीज बिल द्यावे.

३) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये व अर्जदाराने या काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

४) चुकीचे बिल आकारून कोणतीही पुर्वसुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करून वीज कायदा २००३ मधील कलम ५६ चे उंल्लघन केल्याबद्दल व मानसीक त्रासापोटी महावितरण कंपनीने अर्जदारास रूपये ५००/- नुकसान भरपाई ३० दिवसात द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

---

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

---

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६७/२००९/०१** **दिनांक ;-**

**प्रति,**
**चेअरमन,**
**ग्रामसेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित,**
**एच एन १-१६-८०,**
**नारळीबाग औरंगाबाद,**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६७/२००९/०१ )

आपण दिनांक ०२/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**